महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, MIRAJ
Website: gmcmiraj.edu.in ▸ Email: deangmcmiraj@yahoo.co.in ▸ Phone: 0233/2232090-99 ▸ Fax: 0233-2231959

जा.क्र.शावैममि/शावैमरुमि/सहा.प्राध्या/विनिमं/जाहिरात/ १६३२३ /२४, दिनांक: ०७-१०-२०२४

## --जाहिरात --

विषय :- सहाय्यक प्राध्यापक गट-ब संवर्गातील रिक्त पदे स्थानिक/विभागीय निवड मंडळामार्फत ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत..

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक: डीएसबी-१२०१/सीआर/२७६/२००१/वैसेवा-३, दिनांक १०-०८-२००१
२) शासन निर्णय क्रमांक: वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दिनांक ३१ डिसेंबर, २०२०
३) शासन निर्णय क्रमांक: एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३, दिनांक १८ जुलै, २०२४

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज, व संलग्नित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज येथील सहायक प्राध्यापक गट-ब या संवर्गातील खालील रिक्त पदे, सदर पदावर नियमित नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत भारतीय/राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांची पूर्तता करण्यासाठी तसेच रिक्त पदांमुळे विद्यार्थीहित व रुग्णहित बाधीत होऊ नये यासाठी संस्थास्तरावर स्थानिक/विभागीय निवड मंडळाव्दारे ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपातील नियुकतीने भरण्यासाठी या महाविद्यालयाचे gmcmiraj.edu.in या संकेतस्थळावर खालीलप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

संस्थानिहाय भरावयाच्या सहाय्यक प्राध्यापकांचे रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | विषय | रिक्त पदे | एकत्रित ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज** | | | | |
| ०१ | सहाय्यक प्राध्यापक | शरीररचनाशास्त्र | ०३ | शासन निर्णय क्रमांक वेतनी-२०१९/प्र.क्र. ०३/२०१९/वैसेवा-२, दि.३१ डिसेंबर, २०२० अन्वये नियुक्ती कालावधीत दरमहा एकत्रित ठोक मानधन रु.१ लाख इतके अनुज्ञेय राहील. |
| ०२ | | शरीरक्रियाशास्त्र | ०३ | |
| ०३ | | सूक्ष्मजीवशास्त्र | ०२ | |
| ०४ | | औषधशास्त्र | ०३ | |
| ०५ | | विकृतीशास्त्र | ०२ | |
| ०६ | | प्रादेशिक रक्तपेढी | ०१ | |
| ०७ | | न्यायवैद्यकशास्त्र | ०२ | |
| ०८ | | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०४ | |
| ०८ | | औषधवैद्यकशास्त्र | ०३ | |
| ०९ | | क्ष-किरणशास्त्र | ०१ | |
| १० | | कान,नाक व घसाशास्त्र | ०१ | |
| ११ | | नेत्रशास्त्र | ०१ | |
| १२ | | क्षयरोगशास्त्र | ०१ | |
| १३ | | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०२ | |
| १४ | | मनोविकृतीशास्त्र | ०१ | |
| **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय , मिरज** | | | | |
| ०१ | सहाय्यक प्राध्यापक | बधिरीकरणशास्त्र | ०१ | |
| ०२ | | क्ष-किरण | ०१ | |
| ०३ | | स्त्रीरोग प्रसुतीशास्त्र | ०१ | |
| ०४ | | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | |
| ०५ | | विकृतीशास्त्र | ०१ | |

कृ.मा.प..

**अटी व शर्ती -**

१) प्रचलीत शासन नियमानुसार त्या त्या विषयात धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार व गुणवत्तेनुसार तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२) **नमूद रिक्त जागांवर बंधपत्रित उमेदवारांना प्रथम प्राधान्य् देण्यांत येईल. संबधित विषयात बंधपत्रित उमेदवार उपलब्ध न झाल्यास अबंधपत्रित उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.**

३) जाहिरातीमधील नमूद पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली आहे अश्या कार्यरत असलेल्या उमेदवारांनीही अर्ज सादर करुन मुलाखतीमध्ये आपल्या शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या सर्व कागदपत्रासह उपस्थित राहणे बंधनकारक आहे. अन्यथा आपली नियुक्ती, अन्य उमेदवाराला नियुक्ती देण्यात आल्याने समाप्त झाली असे समजण्यात येईल.

४) सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी त्यांच्या पदासमोर दर्शविलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एकत्रित ठोक मानधन लागू राहील.

५) वरील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित ठोक मानधनावर मुलाखतीव्दारे भरण्यांत येणार आहेत. याबाबत या संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यांत येत आहे. इच्छुक व पात्र असलेल्या उमेदवारांनी (कार्यालयातून **विहित नमुन्यातील अर्ज घेऊन तो भरुन सर्व कागदपत्रांसह कार्यालयास मुदतीत सादर करावा**) तसेच आवश्यक त्या सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे तसेच जे उमेदवार अन्य शासकीय अथवा निमशासकीय / खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

६) निवड झालेल्या उमेदवारांना रुजू होण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल. या दरम्यान त्यांनी अन्य ठिकाणी कार्यरत असल्यास तेथील ना-हरकत प्रमाणपत्र/कार्यमुक्ती आदेश सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची सदर जागी नेमणूक करण्यात येईल.

अ) **सहाययक प्राध्यापक पदासाठी शैक्षणिक अर्हता :-**

१) मान्यताप्राप्त विद्यापीठातून एम.बी.बी.एस., पदव्युत्तर पदवी (एम.डी./एम.एस.) उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक अर्हता.

३) **सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या विहित निकषानुसार राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग मान्यताप्राप्त वैद्यकीय** महाविद्यालयातील **वरिष्ठ निवासी या पदाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव व तसे प्रमाणपत्र आवश्यक.**

४) **संबंधित विषयातील डिएनबी अर्हताधारक यांना सहाय्यक प्राध्यापक पदावर नियुक्ती देण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाची अट लागू राहील,**

**ब) सहाययक प्राध्यापक या पदासाठीचे निकष व क्रम खालीलप्रमाणे राहतील.**

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज येथून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक

२) महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक (महानगर पालीकेच्या महाविद्यालयांसह).

३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक.

४) महाराष्ट्रातील इतर खाजगी विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक.

५) बंधपत्रित उमेदवारांना प्राध्यान्य् देण्यात येईल.

वयोमर्यादा :- **खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष**

**टिप :- निवड प्राप्त उमेदवारांना आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने लावण्यांत येणाऱ्या डयूटी करणे बंधनकारक राहील.**

पान ३ वर...

वरील नमूद पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची संबंधितानी नोंद घ्यावी तसेच ज्या उमेदवारांनी या **जाहिरातीपुर्वी वरील पदांसाठी अर्ज सादर केलेले असतील अथवा सदर पदावर तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्तीने कार्यरत असतील, त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुन:श्च विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे / मुलाखतील उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

सदरच्या मुलाखतीच्या दिनांकात बदल करणे, रिक्त पदसंख्येत बदल करणे अथवा सदरची नियुक्ती/ भरती प्रक्रिया रदद करणे याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित कार्यालयातून घेऊन तो यथोचितरित्या भरुन आवश्यक त्या सर्व छायांकित व साक्षांकित कागदपत्रांसह मुदतीत प्रशासकीय कार्यालयातील संबंधित राजपत्रित आस्थापना शाखेत जमा करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| जाहिरात प्रसिध्दीचे संकेतस्थळ | www.gmcmiraj.edu.in |
| जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक | ०३-१०-२०२४ |
| अर्ज स्विकृती कालावधी | ०३-१०-२०२४ ते १५-१०-२०२४ रोजी सायं. ०५ पर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) |
| विहित अर्ज मिळण्याचे ठिकाण | वर्ग-२ आस्थापना शाखा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज |
| अर्जाची समितीव्दारे छाननी दिनांक | १६-१०-२०२४ |
| मुलाखतीचा दिनांक | १७-१०-२०२४ |
| मुलाखतीची वेळ | दुपारी ०३-०० वाजतां |
| मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज येथील महाविद्यालयीन परिषद सभागृह. |

सोबत :- अर्जाचा नमुना.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय * मिरज

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज

प्रति,

१) उपरोक्त सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

२) वैद्यकीय अधिक्षक, शावैमरुमिरज/पवपाशारुसांगली.

३) सूचना फलक, विद्यार्थी वसतिगह,बाहयरुग्ण् विभाग, मिरज-सांगली/ अधिष्ठाता कार्यालय/ ग्रंथालय, शावैममिरज/शावैमरुमिरज/पवपाशारुसांगली

४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय- मुंबई/ पुणे/ नागपूर/ संभाजीनगर/ सोलापूर/ अंबाजोगाई/ नांदेड/ धुळे/ यवतमाळ/ कोल्हापूर/ अकोला/ लातूर/ गोंदिया/ चंद्रपूर/ जळगांव/ बारामती/ नंदुरबार/ अलिबाग/ सिंधुदुर्ग/ सातारा/ धाराशिव/ परभणी/ रत्नागिरी/ पालघर/ अंबरनाथ-जि.ठाणे/ बुलढाणा/ जालना/ हिंगोली/ हिंगणघाट-जि.वर्धा/ अमरावती/ भंडार/ गडचिरोली/ वाशिम. **यांना ई-मेलव्दारे सादर करण्यात येऊन विनंती करण्यात येते की, कृपया या जाहिरातीस आपल्या संस्थेतील सूचना फलकावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.**

प्रत : माहितीसाठी सविनय सादर.

१) मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय , गो.ते.रुग्णालय संकुल, ९ वा मजला, मुंबई

२) मा.आयुक्त् (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई-१.

३) मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई-१.

## सहाय्यक प्राध्यापक गट-ब या पदावर तात्पुरत्या नियुक्तीसाठी अर्जाचा नमुना

अर्जदाराचा फोटो

प्रति,
मा.अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज /
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज

विषय :- सहाय्यक प्राध्यापक (विषय-------------------------------------------) गट-ब पदावर नियुक्तीसाठी अर्ज

संदर्भ :- संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेली जाहिरात जा.क्र. १६३२३ , दि. ०१-१०-२०२४

मा.महोदय,

आपल्या संदर्भीय जाहिरातीनुसार मी सहाय्यक प्राध्यापक गट-ब या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. जाहिरातीमधील अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर पदासाठी आवश्यक ती पात्रता मी पूर्ण करीत असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| ०२ | वडीलांचे / पतीचे पूर्ण नाव व संपूर्ण पत्ता | |
| ०३ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | |
| ०४ | जन्म दिनांक व सध्याचे वय | |
| ०५ | भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक | |
| ०६ | ई-मेल आयडी | |
| ०७ | वय राष्ट्रीयत्व् व अधिवास प्रमाणपत्र (प्रत जोडणे) | |
| ०८ | शाळा सोडल्याचा दाखला (प्रत जोडणे) | |
| ०९ | अर्जदाराचा संवर्ग/प्रवर्ग, (लागू असल्यास)जात व जात वैधता प्रमाणपत्राची व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची प्रत जोडणे | |
| १० | १० प्रमाणपत्र व १२ वी प्रमाणपत्राची प्रत जोडणे | |
| ११ | एमबीबीएस महाविद्यालयाचे नांव,विद्यापीठाचे नाव, (शासकीय कि खाजगी) प्रयत्न् प्रमाणपत्र, उत्तीर्ण वर्ष, एकूण गूण (कितीपैकी किती) सर्व वर्षांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र (प्रती जोडणे) | |
| १२ | आंतरवासियता पूर्णता प्रमाणपत्र (प्रत जोडणे) | |
| १३ | एमबीबीएस पदवी प्रमाणपत्र (प्रत जोडणे) | |
| १४ | पदव्युत्तर महाविद्यालयाचे नांव, विद्यापीठाचे नाव, (शासकीय कि खाजगी) प्रयत्न प्रमाणपत्र, उत्तीर्ण वर्ष, एकूण गूण (कितीपैकी किती) सर्व गुणपत्रिका व प्रमाणपत्र (प्रती जोडणे) | |
| १५ | अर्ज करीत असलेल्या विषयातील पदव्युत्र पदवी प्रमाणपत्र (प्रत जोडणे) | |
| १६ | इतर / उच्च् शैक्षणिक अर्हता (प्रती जोडणे) | |
| १७ | एमएमसी/आयएमसी नोंदणी क्रमांक, व अद्ययावत नुतणीकरण प्रमाणपत्र (प्रती जोडाव्यात) | |
| १८ | बंधपत्रित असल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे/अधिष्ठातांचे प्रमाणपत्र (प्रत जोडणे) | |

कृ.मा.प..

| | | |
|---|---|---|
| १९ | वरीष्ठ निवासी पदावरील व अन्य अनुभवाचा कालावधी व प्रमाणपत्र (प्रत जोडणे) तसेच सदर महाविद्यालय रा.आ.आयोग मान्यताप्राप्त असल्याचा पुरावा जोडणे. | |
| २० | अन्य संस्थेत कार्यरत असल्यास तेथील संस्थाप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र व निवड झाल्यास कार्यमुक्त करण्यास तयार असलेबाबतचे पत्र जोडावे | |
| २१ | सध्या या संस्थेत कार्यरत असल्यास विभागप्रमुखांची शिफारस (प्रत जोडणे) अशा उमेदवारांनी विभागप्रमुखांमार्फतच अर्ज सादर करावा. | |
| २२ | आधार कार्ड व पॅन कार्ड (प्रत जोडणे) | |

ठिकाण :

दिनांक :

------------------------

अर्जदाराची स्वाक्षरी

## कार्यालयीन कामकाजासाठी

| मुळ प्रमाणपत्र व अन्य आवश्यक बार्बीची पडताळणी | |
|---|---|
| सदर उमेदवारांचे अर्जातील नमूद मुळ प्रमाणपत्रांची, कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे. सदर पदासाठी आवश्यक प्रमाणपत्रे जोडली आहेत | |
| सदर प्रमाणपत्रांची त्रुटी आहे:- | |
| पडताळणी करणाऱ्या संबंधित विषयातील विभागप्रमुखांचा (नांव, स्वाक्षरी, व शिक्का यासह) अभिप्राय/ शिफारस :- | |